अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ५ ऑक्टोबर २०२३ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## सोरेगावजवळ जलवाहिनी दुरुस्तीचे काम अखेर पूर्ण

✔ **सोलापूर** : टाकळी ते सोरेगाव दरम्यान मुख्य जलवाहिनीला सोरेगावजवळ लागलेली गळती बंद करण्याचे काम बुधवारी दुपारी महापालिकेने चार तासात पुर्ण केले. त्यामुळे दुपारनंतर येथून पाणीपुरवठा सुरळीत झाला.

सोरेगाव एसआरपी पेट्रोल पंपाजवळ मुख्य जलवाहिनीला दीड फुटाची मोठी गळती होती. गेल्या अनेक दिवसापासून या गळतीमुळे पाणी वाया जात होते. या जलवाहिनीतील पाणी दूरपर्यंत जात होते. शेतात पाणी शिरल्यामुळे पिकांचेही नुकसान झाले होते. अखेर काही शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी तातडीने जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे आदेश दिले. या कामासाठी जलवाहिनीला शटडाऊन घ्यावा लागला. पाण्याचा उपसा बंद केल्यामुळे बुधवारी सोरेगाव येथून शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर थोडा परिणाम झाला. याबाबतची पुर्वसूचना नागरिकांना देण्यात आली होती. दुपारनंतर येथून पाणीपुरवठा सुरळीत झाला. टाकळीप्रमाणेच भवानी पेठ येथील पंप हाऊस येथेही शटडाऊन घेण्यात आले होते. त्यामुळे बुधवारी आणि गुरुवारी असा दोन दिवस पुरेशा प्रमाणात पाण्याचा उपसा होणार नाही. या कालावधीत सोलापूर शहराचा पाणी पुरवठा उशिरा कमी वेळ व कमी दाबाने होणार आहे, असेही महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी सूचित केले.

# ‘बॉस’ अजितदादाच!

## नाराजीचा ‘प्लॅन’ करून शिंदे गटाचा केला ‘गेम’



✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महायुतीच्या सत्तेत गेल्या काही दिवसांपासून रखडलेल्या पालकमंत्रीपदाच्या वाटणीचे ग्रहण बुधवारी एकदाचे सुटले. १२ जिल्ह्यांच्या सुधारित यादीत फुटीर राष्ट्रवादी गटाचे नेते तथा महायुतीच्या सत्तेत गेलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचीच कमांड असल्याचे दिसून येते. सत्तेत गेल्यानंतर अजितदादांनी शहकाटशहचे राजकारण सुरू करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना चॅलेंज द्यायला सुरूवात केली. भाजपच्या मनात नसतानाही अर्थ विभागाचे आधी मलईदार खाते त्यांनी काबिज केले. आता भाजप नेत्यांना टपली देत पुण्याचे पालकमंत्रीपदही प्राप्त केले.पालकमंत्र्यांच्या निवडीत अजितदादांनी नाराजीचा ‘प्लॅन’ करून दुसऱ्यांदा शिंदे गटाचा पद्धतशीर ’गेम’ केल्याची चर्चा आहे. अजितदादांचे सत्तेतील वाढते प्रस्थ भाजपलाही त्रासदायक ठरणार असल्याने येत्या काळात सत्तेची समीकरणे कशी असतील,याविषयी राजकीय क्षेत्रात उत्सुकता निर्माण झाली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसला खिंडार पाडून भाजपच्या मांडीला मांडी लावून सत्तेत सहभागी झालेल्या अजितदादांनी पुन्हा एकदा शिंदे गटाला कात्रजचा घाट दाखवला आहे. गेल्या काही दिवसांपासून अजितदादा नाराज असल्याची चर्चा चांगलीच रंगली होती. त्यामुळे ते पुन्हा एकदा कोणता मोठा निर्णय घेणार का? इथपर्यंत ही चर्चा जाऊन पोहोचली होती. मात्र, आता या नाराजीचा सर्व उलगडा बुधवारी एका क्षणामध्ये झाला.पालकमंत्र्यांच्या सुधारित यादीत अजितदादांच्या गटातील तब्बल सात मंत्र्यांना पालकमंत्रीपद देण्यात आले आहे.

**पॉवर सेंटर पुणे** : अजित पवार आपल्या मित्रपक्षांवर दबाव टाकून आपल्याला हवे ते करण्यात पटाईत आहेत. १५ वर्षे काँग्रेसने राष्ट्रवादीच्या या दडपशाहीचा किंवा दबाव राजकरणाचा अनुभव घेतला आता तोच अनुभव भाजपला येत आहे. अजित पवार सत्तेत सहभागी झाले खरे पण त्यांचे मुख्य लक्ष्य हे पुण्याच्या पालकमंत्री पदावर होते. अजित पवारांच्या राजकारणाचे पॉवर सेंटर पुणे आहे. आपल्या होमपीचवरील आपला वचप कायम राहावा यासाठी अजित पवार आग्रही होते. मात्र आता भाजपसमोर पुण्यात आपला पक्ष टिकवण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

### चंद्रकांतदादांची उचलबांगडी

पुण्यातून चंद्रकांत पाटील यांची उचलबांगडी करून त्या ठिकाणी स्वतः उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जबाबदारी घेतली. दुसरीकडे पाटील यांना सोलापूर व अमरावती या दोन जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आली. त्याचबरोबर कोल्हापूरमधूनही शिंदे गटाची उचलबांगडी करण्यात आली आहे. याठिकाणी दीपक केसरकर यांना पालकमंत्री पदावरून बाजूला करून त्या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे. दुसरीकडे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे त्यांच्या बीड जिल्ह्याचे याच पालकत्व देण्यात आले आहे. प्रतिष्ठा पणाला लावून पाटील यांनी पुण्याचे पालकत्व सोडण्यास विरोध केला होता.

### अन् ‘सासूच आली वाटणीला’

अजितदादा सत्तेत सहभागी झाल्यानंतर शिंदे गटाकडून सातत्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. सासूसाठी वाटणी केली आणि सासूच वाटणीला आली, अशी स्थिती मुख्यमंत्री शिंदे गटाची राहिली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून अजितदादा नाराज असल्याची चर्चा असतानाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे तातडीने दिल्लीला गेले होते. या भेटीमध्येच पालकमंत्रीपदाचा निकाल लागला आहे. त्यामुळे आता एकंदरीतच एकंदरीत पालकमंत्रीपदाचा तिढा काहीसा सुटला असला, तरी शिंदे गटाची नाराजी पुन्हा एकदा वाढत जाण्याची शक्यता आहे.

### ‘ग्रहण’ सुटले; महामंडळावरून ’पेटले’

महामंडळांच्या वाटणीवरून शिंदे गट आणि भाजपात राजकारण रंगणार असल्याचे चित्र आहे. भाजपाच्या प्रस्तावानुसार १०० महामंडळांपैकी ५० भाजपाकडे, २५ शिवसेनेच्या शिंदे गटाला आणि २५ राष्ट्रवादीला देण्यात येणार आहेत. मात्र, हा प्रस्ताव शिंदे गटाला मान्य नसल्याचे समजते आहे. शिंदे गट आणि राष्ट्रवादीला प्रत्येकी ३० आणि भाजपाला ४० महामंडळे देण्यासाठी आग्रही आहे. तर राष्ट्रवादीने शिंदे गटाला जेवढी महामंडळे मिळतील तेवढीच आपल्याला हवीत अशी अट लावली आहे. यामुळे फडणवीसांनी सांगितल्याप्रमाणे भाजपा छोट्या भावांना सांभाळून घेते का, शिंदे गटासाठी १० महामंडळे कमी घेते का असा प्रश्न उपस्थित होत आहे. या आठवड्याभरात महामंडळांचाही प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता आहे.

### नाराजीमुळे तिढा सुटला

राज्यातील महायुतीच्या सरकारमध्ये अजित पवार नाराज असल्याच्या चर्चा आहेत. अजित पवारांनी गणेशोत्सवाच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी गणपतीच्या दर्शनाला जाण्याचं टाळले. तसेच मंगळवारी झालेल्या राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीलाही त्यांनी दांडी मारली. त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्ली दौऱ्यावर गेले आणि अनेक महिन्यांपासून रखडलेला पालकमंत्री पदाचा तिढा सुटला.

## मोटारसायकल-कारची धडक; किरनळीचा तरुण ठार

✔ सुराज्य/अक्कलकोट



तालुक्यातील भुरीकवठा ते वागदरी रस्ता दरम्यान मोटारसायकल व कार यांची समोरासमोर जोराची धडक झाली. या अपघातात एक २७ वर्षाच्या अविवाहित तरुण शेतकरी ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी रात्री सात वाजण्याच्या दरम्यान घडली.

यशवंत सुंदरबाबू कोळेकर (वय २७ वर्ष, रा. किरनळी) असे ठार झालेल्या अविवाहित तरुण शेतक-याचे नांव आहे तर संतोष नागनाथ कोळेकर (वय १५ वर्ष, रा. किरनळी) हे एक जण गंभीर जखमी झाला आहे.या जखमीला सोलापूरच्या खासगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

भुरीकवठा- वागदरी हा रस्ता अरुंद असून या रस्त्यावर नेहमीच वाहनांची रेलचेल आढळून येत आहे. या रस्त्यावरून वाहने सुसाट वेगाने धावत आहेत. यामुळे या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. सोमवारी रात्री सात ते साडेसात वाजता किरनळीहून भुरीकवठामार्गे वागदरीकडे येणारी एक मोटर सायकल (एमएच १३ डीजी ८८०२) व वागदरीहून भुरीकवठाकडे जाणारी कार (एम.एच.१२ केजी ००१२) या दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. या धडकेमध्ये मोटरसायकलवरील यशवंत कोळेकर याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर संतोष कोळेकर हा गंभीर जखमी झाला आहे.यातील जखमी संतोष कोळेकर यास पुढील उपचारासाठी सोलापूरच्या खासगी रुग्णालयात दाखल केले आहेत.

अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक इसाक दिंडूरे, सपोनि महेश भाविकट्टी, अंगद गीते, विपीन सुरवसे, राम चौधरी, मल्लिनाथ कलशेट्टी, गोविंद राठोड यांनी घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा केला. अधिक तपास कॉन्स्टेबल प्रवीण वाळके हे करित आहेत.

यशवंत कोळेकर हा किरनळी गावात पदवी पर्यंतचे शिक्षण घेऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्कृष्ट पध्दतीने शेती व्यवसाय सुरू केला होता. विविध प्रकारच्या पीक घेत फळ लागवड करुन भरघोस उत्पादन घेत होता. गावातील तरुण युवक शेतकरी अपघातात ठार झाल्याने किरनळी गावात शोककळा पसरली होती.

## एलपीजी सिलेंडरवर मिळणार ३०० रुपयांची सबसिडी




✔ सुराज्य/नवी दिल्ली

दिवाळीपूर्वीच केंद्रातील मोदी सरकारने सामान्यांना मोठा दिलासा दिला आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान (सबसिडी) २०० रुपयांवरुन ३०० रुपये करण्याचा निर्णय केंद्र सरकारने आज झालेल्या बैठकीत घेतला.

रक्षाबंधन आणि ओणमच्या निमित्ताने एलपीजीच्या दरात २०० रुपयांची कपात करण्याची घोषणा मंत्रिमंडळाने केली होती. आज ही रक्कम २०० रुपयांवरुन ३०० रुपये करण्यात आली आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी बैठकीनंतर पत्रकार परिषदेत सांगितले की, पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली. रक्षाबंधन आणि ओणमच्या निमित्ताने आम्ही एलपीजी सिलिंडर २०० रुपयांनी कमी केले होते. ही किंमत ११०० रुपयांवरून ९०० रुपयांपर्यंत कमी केली. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना ७०० रुपयांना गॅस मिळू लागला. पण, आता उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना ३०० रुपये अनुदान मिळणार आहे. म्हणजेच उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांना फक्त ६०० रुपयांना गॅस सिलिंडर मिळणार आहे.

यावेळी अनुराग ठाकूर यांनी इतर निर्णयांचीही माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, भारत हा हळदीचा सर्वात मोठा उत्पादक आणि ग्राहक आहे.

## खंडणी न दिल्याच्या कारणावरून रुग्णवाहिकेची तोडफोड

### कुर्डूवाडीतील घटना

✔ सुराज्य/सोलापूर

दारू आणि जेवणासाठी २ हजार रुपयांची खंडणी न दिल्याच्या कारणावरून रुग्णवाहिकेची (ॲम्बुलन्स) तोडफोड करून २० हजारांचे नुकसान करण्यात आले. ही घटना कुर्डूवाडी येथील ग्रामीण रुग्णालयाजवळ घडली. या प्रकरणी कुर्डूवाडी पोलिसांनी प्रवीण ढेकळे (रा.यशवंत नगर,कुर्डूवाडी) याच्याविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात धीरज ऊर्फ बालाजी माणिक कोळेकर (रा. कुर्डूवाडी) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. ते (एम.एच.-४५-८३०२) या क्रमांकाची ॲम्बुलन्स पेशंटच्या वाहतुकीसाठी ग्रामीण रुग्णालयाजवळ उभी करीत असतात. त्यावेळी प्रवीण ढेकळे याने त्यांना २ हजार रुपयांच्या खंडणीची मागणी केली. त्यांनी पैसे दिले नाही या कारणावरून त्याने ॲम्बुलन्सच्या काचेवर दगड मारून त्याची तोडफोड केली. तसेच कोयत्याने बोनेटकर मारून वाहनाचे २० हजारांचे नुकसान केले. तपास सहाय्यक फौजदार लोंढे करीत आहेत.

## आजपासून क्रिकेट वर्ल्डकपचा थरार

✔ सुराज्य/नवी दिल्ली




गत विजेता इंग्लंड व गतउपविजेता न्यूझीलंड यांच्यातील सलामीच्या लढतीने गुरुवार, दि. ५ ऑक्टोबरपासून अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडीयवर वनडे वर्ल्डकप क्रिकेटचा थरार रंगणार आहे.

भारतीय क्रिकेट संघ एकदिवशीय विश्वचषक स्पर्धा जिंकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहणार आहे. एक दशकाहून अधिक काळ लोटला. तरी अद्यापही भारताला आयसीसीचे जेतेपद पटकावला आले नाही. सन २०१३ मध्ये भारताने महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. त्यावेळी रोहित शर्मा संघाचा एक भाग होता. सन २०१३ पासून भारत टी-ट्वेंटी, वनडे आणि कसोटी या तिनही प्रकारच्या क्रिकेटमध्ये सहभाग घेत आला आहे. परंतु अद्यापर्यंत त्यांना ट्रॉफी जिंकण्यात अपयश आले आहे.

गुरूवारी न्यूझीलंड आणि इंग्लंड यांच्यात सामना रंगणार आहे. हे दोन्ही संघ सध्या चांगल्या फॉर्ममध्ये असून न्यूझीलंडने आपले दोन्ही सराव सामने जिंकून दमदार सुरूवात केली आहे. इंग्लंडने देखील आपल्या दोनपैकी एक सराव सामना जिंकला. तर भारताविरूद्धचा सराव सामना पावसामुळे रद्द झाला. इंग्लंडविरूद्धच्या मोठ्या सामन्यात न्यूझीलंडसमोर दोन मोठ्या समस्या असणार आहेत. संघाचा कर्णधार केन विलियमसन आणि टीम साऊदी हे दोन अव्वल खेळाडू पहिल्या सामन्याला मुकणार आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



१०० टक्के पुरत नाहीत,
५० टक्क्यांनी काय होणार?

कल्याण
460-00-226

मुंबई
346-35-140

## सोलापूरच्या पालकमंत्रीपदाची धुरा चंद्रकांतदादा पाटलांकडे

✔ सुराज्य/सोलापूर

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने बुधवारी राज्यातील काही जिल्ह्यांचे पालकमंत्री जाहीर केले आहेत. राज्य मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रिपद देण्यात आले आहे.**

पालकमंत्री नवीन मिळेल, अशी चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सोलापूर जिल्ह्यात सुरू होती. आजअखेर पालकमंत्री म्हणून चंद्रकांतदादा पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) सरकार आल्यानंतर सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रीपद राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे देण्यात आले होते मात्र त्यांच्याकडे आधीपासून नगर जिल्ह्याचे मंत्री पालकमंत्री पद असल्याने त्यांना सोलापूरला पुरेसा वेळ देणे शक्य होत नव्हते. त्यामुळे पालकमंत्री बदलण्याची मागणी होत होती. अशातच अजित पवार सत्तेत सहभागी झाल्यानंतर सत्तेची वाटेकरी वाढले होते. त्यामुळे पालकमंत्री बदलीच्या हालचाली सुरु झाल्या होत्या. अखेर बुधवारी ११ पालकमंत्री नव्याने जाहीर करण्यात आले. त्यात सोलापूरची धुरा चंद्रकांतदादांकडे देण्यात आली.

चंद्रकांतदादांकडे सध्या वस्त्रोद्योग खाते आहे. सोलापूर शहरही वस्त्रोद्यागासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे चंद्रकांतदादा यांच्या खात्याकडून सोलापूरच्या पदरी मोठे काहीतरी पडेल, अशी आशा नेत्यांसह तमाम सोलापूरकांना लागली आहे. त्यामुळे त्यांच्या सोलापूरच्या पहिल्या दौऱ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सोलापूर सोबतच त्यांच्याकडे अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री पदही असणार आहे. पाटील हे पुणे पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढवित असल्यामुळे त्यांचा थेट सोलापूरशी संबंध होता. याठिकाणचे राजकारण नेमके काय आहे, याची जाणीव पाटील यांना आहे. शहरात माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख व माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांचे गट कार्यरत आहेत. याशिवाय जिल्ह्यात खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर व आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्यामध्येही शीतयुद्ध आहे. जिल्ह्यातील ही राजकिय परिस्थिती हाताळण्यात नवे पालकमंत्री पाटील हे कितपत यशस्वी होतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



### विखेंना मिळाला दिलासा

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे पालकमंत्रीपद होते. त्यावेळी त्यांना जिल्ह्याला योग्य तो न्याय देता येत नव्हता. त्यांच्याकडे त्यांच्या नगर जिल्ह्याचीही जबाबदारी होती. त्यामुळे त्यांची अडचण होत होती. पण, आता त्यांना दिलासा मिळाला आहे.

### गेटकेन पालकमंत्र्यांचा शिक्का बसणारच

गतवेळी २०१४ ते २०१९ मध्ये सोलापूर जिल्ह्याला स्थानिक आमदार विजयकुमार देशमुख संपूर्ण कार्यकाळ पालकमंत्री लाभले होते. मात्र २०१९ मध्ये भाजप सरकार जाऊन महाआघाडी सरकार आले. त्यावेळी दिलीप वळसे-पाटील, जितेंद्र आव्हाड, दत्तात्रय भरणे हे गेटकेन पालकमंत्री लाभले. त्यानंतर अडीच वर्षांनंतर सत्ताबदल झाल्यानंतरही तेच घडले. भाजपचे सरकार आले. तेव्हा राधाकृष्ण विखे-पाटील हेही बाहेरचेच पालकमंत्री होते. आताही चंद्रकांत दादा गेटकेनच पालकमंत्री सोलापूरला लाभले.